Indian Council of Social Science Research

आज़ादी का अमृत महोत्सव

Hindustani Education Society's

# AZAD MAHAVIDYALAYA, AUSA

*NAAC Accredited B+ Grade (III Cycle) with CGPA 2.73*

**ICSSR Sponsored & Department of History**

*Organised*

## One Day National Conference

on

# Contribution of Women in Indian Freedom Struggle

*(Under the Theme of 'Azadi ka Amrit Mahotsav)*

Date : 29/04/2023


Chief Editor

**Dr. E. U. Masumdar**

Editor

**Dr. S. B. Shaikh**

**Dr. A. V. Pathan**

**Dr. M. M. Kotwal**

**Dr. S. K. Ladaf**


Scanned by CamScanner

**Contribution of Women in Indian Freedom Struggle**
(One Day National Conference)

Chief Editor
**Dr. E. U. Masumdar**

Editors
**Dr. S. B. Shaikh**
**Dr. M. M. Kotwal**
**Dr. A. V. Pathan**
**Dr. S. K. Ladaf**

**Date : 29/04/2023**

Publishers
**Yugpravartak Prakashan,**
Babhalgaon, Latur-413531 (Maharashtra)

Printers
**M/s. Printline Industries,**
Babhalgaon, Latur-413531 (Maharashtra)

**Price : Rs. 300/-**

**ISBN : 978-81-937477-5-9**

---

**Note:** The views expressed in the research articles published in the said issue are those of the respective authors/researchers and do not necessarily agree with the editors, printers and publishers.

Scanned by CamScanner

# अनुक्रमणिका



| अ.क्र. | शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| 1 | Contribution of women in freedom movement - 'A Study'<br>- Dr. Prakash Laxmanrao Dompale | 1 - 9 |
| 2 | Indian Women Scientist: In India's Struggle For Independence<br>- Dr. Pathan A.V. | 10 - 13 |
| 3 | Women's Contributions to India's FreedomStruggle<br>- Dr. Deepak S. Vede | 14 - 20 |
| 4 | The Contribution of Iron Ladies in development of India and their Role in the Freedom - Dr. Manorama B. Motegaonkar | 21 - 29 |
| 5 | The Role Of Women In Indian Freedom Struggles: Rani Laximibai<br>- Dr. Gaikwad Vrundavani Venkatrao | 30 - 32 |
| 6 | Vijaya Lakshmi Pandit: Role In Freedom Struggle And Politics<br>- Dr. Shaikh Afsar Nawaboddin | 33 - 36 |
| 7 | Contribution of Women in the Indian Freedom Struggle<br>- Prof. Nazir Pathan | 37 - 43 |
| 8 | Woman Contribution in Indian Freedom Struggle<br>- Dr. R. M. Mahindrakara & Dr. R. V. Suryawanshib | 44 - 48 |
| 9 | A Critical Study of the Role of Vijayalakshmi Pandit in Indian Freedom Struggle - Dr. Syed Nisar Karim | 49 - 51 |
| 10 | Social welfare participation of women in Indian freedom struggle<br>- Dr. Gholap K. G | 52 - 58 |
| 11 | 1587 च्या उठावात झाशीच्या राणीचे योगदान<br>- प्रा. डॉ. सुदर्शन सदाशिव क्षेत्री | 59 - 61 |
| 12 | भारताच्या स्वातंत्र्यलढ्यातील निवडक महिलांचे योगदान - एक अभ्यास<br>- प्रा.डॉ.अनंत नामदेवराव शिंदे | 62 - 65 |
| 13 | १८५७ च्या उठावात स्वातंत्र्य युध्दातील सर्वोन्मुखी नाव राणी लक्ष्मीबाईची शौर्य गाथा<br>- डॉ.सुनिलचंद्र सोनकांबळे | 66 - 69 |
| 14 | शांताबाई : स्वातंत्र्य चळवळीतील महिला क्रांतिकारक<br>- डॉ. तोंटे दादासाहेब सर्जेराव | 70 - 72 |
| 15 | भारतीय स्वातंत्र्य् लढ्यातील महिलांचे योगदान (इ.स.1904 ते 1947)<br>- प्रा. डॉ. बोचरे जे. एम. | 73 - 75 |
| 16 | स्वातंत्र्य चळवळीत भारतीय महिलांचा सहभाग<br>- प्रा. आरजू शेख | 76 - 82 |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| 17 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महिलांचा सहभाग<br>- प्रा. डॉ. एस. जी. शिंदे | 83 - 86 |
| 18 | १८५७ च्या लढ्यातील वीरांगना : बेगम हजरत महल - डॉ. दत्तात्रय गोरख मगर / गणेश रेवणसिद्ध वाघमारे | 87 - 91 |
| 19 | भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अरुणा असफ़ अली यांचे योगदान<br>- प्रा . रोडे सहदेव गंगाराम | 92 - 97 |
| 20 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे योगदान<br>- प्रा. डॉ. संजय संदिपान चव्हाण | 98 - 99 |
| 21 | इतिहास लेखन प्रवाहातील :- स्थानिक इतिहास लेखन काळाची एक गरज<br>- प्रा. राजभोज संदीप बाबासाहेब | 100 - 103 |
| 22 | क्रांतीकारी चळवळीतील एक महिला क्रांतीकारी: कल्पना दत्त<br>- प्रा. डॉ. शहाजहान शेख | 104 - 105 |
| 23 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीत महिलांचे योगदान<br>- डॉ. दिलीपकुमार दगडू क्षीरसागर | 106 - 111 |
| 24 | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात स्त्रियांचे योगदान<br>- प्रो.महेबूब शरफोद्दीन मंगरूळे | 112 - 117 |
| 25 | गांधीवादी चळवळीतील स्त्रियांचा सहभाग<br>- प्रा. एन. बी. तिळगुळे | 118 - 120 |
| 26 | Muslim Women’s Involvement in India's Freedom Struggle<br>- Dr. Inamdar M. M. | 121 - 125 |
| 27 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील पहिल्या सत्याग्रही महिला : कस्तुरबा गांधी<br>- डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार | 126 - 131 |
| 28 | भारताच्या महिला स्वातंत्र्यसैनिक<br>- डॉ. एम. ए. बरोटे | 132 - 134 |
| 29 | भारतीय राष्ट्रीय चळवळीत स्त्रीयांचे योगदान<br>- प्रा. शेख एजाज फतरुसाब | 135 - 137 |
| 30 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचा सहभाग - प्रा. डॉ. नरेंद्र बाळासाहेब देशमुख | 138 - 141 |
| 31 | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील महिलांचे योगदान - प्रा. डॉ. सौ. गुडे डी. टी. | 142 - 143 |
| 32 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील कमलादेवी चटोपाध्यायांचे योगदान - प्रा. गोरे आर. व्ही. | 144 - 145 |
| 33 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात डॉ. ॲनी बेझंट यांचे कार्य – एक अभ्यास<br>- डॉ. लदाफ एस. के. | 146 - 149 |
| 34 | भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील महिलांचे योगदान - प्रा. के. एच. पटेल | 150 - 152 |
| 35 | 1857 च्या उठावमधील झाशीची राणी लक्ष्मीबाई हीचे योगदान - प्रा. उकरंडे जी. एन. | 153 - 154 |
| 36 | भारतीय स्वतंत्रता आंदोलन में महिलाओं का योगदान - प्रा. मजहर एम. कोतवाल | 155 - 158 |


Scanned by CamScanner

 ISBN : 978-81-937477-5-9

# भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील पहिल्या सत्याग्रही महिला : कस्तुरबा गांधी

डॉ. सुभाष गणपतराव बेंजलवार
इतिहास विभागप्रमुख,
महाराष्ट्र महाविद्यालय, निलंगा
जि. लातूर

भारतीय स्वातंत्र्य लढा म्हटले की, महात्मा गांधी यांचे नाव अगदी सहजच ओठावर येते, किंबहुना ते आलेच पाहिजे. स्वातंत्र्य चळवळीला व्यापक जनाधार गांधीनीच प्राप्त करून दिला. किंबहुना स्वातंत्र्य लढ्याला अहिंसात्मक सात्याग्रहासारखे अपराजित शस्त्र देवून स्वातंत्र्य मिळवण्यात महत्वपूर्ण भूमिका त्यांचीच राहिली. असे असले तरी त्यांच्या आयुष्यात ६२ वर्षे साथसंगत केलेल्या त्यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांची प्रतिमा, त्यांचा त्याग व स्वातंत्र्य लढ्यासाठी त्यांनी दिलेले योगदान मात्र दुर्लक्षित राहिले. खरे तर स्वातंत्र्य लढ्याच्या या इतिहासामध्ये कस्तुरबा गांधी यांची नोंद केवळ तळटिपेच्या स्वरुपात घेतली जाते, परंतु त्या या स्वातंत्र्यलढ्याचा एक उपयुक्त अशा पाठच होत्या हे मात्र फारसे लक्षात घेतले जात नाही. प्रस्तुत लेखामध्ये कस्तुरबा गांधी यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान या अर्थाने भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सत्याग्रही म्हणून त्यांच्या कार्याचा धांडोळा घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे, अर्थात कस्तुरबा गांधींचे कार्यकर्तृत्व यापेक्षाही विशालकाय असे आहे.

खरे पाहता कस्तुरबा गांधींचे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील योगदान आपण सिद्ध करण्याची आवश्यकताच नाही. भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे अध्वर्यू महात्मा गांधी यांनीच यासंदर्भात नमूद करून ठेवले आहे. ते म्हणतात की, “अहिंसेचा पाठ मी माझी पत्नी कस्तूरकडून शिकलो. एका बाजूला माझ्या इच्छेला तिचा प्रखर विरोध, तर दुस-या बाजूला माझ्या मुर्खपणाच्या कृतीपुढे तिची निमूट शरणागती यांनी मला शेवटी शरमिंदा बनविले आणि त्यातूनच मी माझ्या मुर्खपणातून बाहेर पडलो”.(अरुण गांधी; कस्तुरबा शलाका तेजाची,२००८) भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महत्वाची भूमिका बजावलेले अहिंसेचे तत्व खऱ्या अर्थाने महात्मा गांधीनी कस्तुरबा यांच्याकडून घेतल्याचे त्यांनी स्वत:चा मान्य केले आहे. कस्तुरबा गांधींचे त्यांच्या आयुष्यातील स्थान विषद करताना गांधी म्हणतात की, “माझ्यातले उत्तम अर्धांग मरण पावलेय. मी बा नाही अशा आयुष्याची कल्पनाच करू शकत नाही, ती माझे अभिन्न अंग होती आणि ती गेल्यामुळे कधी भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे”. (अरुण गांधी:२००८:३०१) या त्यांच्या विधानावरून गांधीजींच्या जीवनात व भारतीय स्वातंत्र्य लढ्यात कस्तुरबा किती महत्वाची भूमिका बजावत होत्या हे लक्षात येते.

भारतीय समाजजीवनात दुर्दैवाने एक समज असा आहे की, मोठ्या वटवृक्षाच्या सावलीखाली दुसरे रोपटे उगवत नाही व ते वाढत नाही तसे असामान्य कर्तृत्वाचा धनी असणाऱ्या व्यक्तीच्या कुटुंबात दुसरी तसी व्यक्ती तयार होत नाही असे म्हटले जाते. गांधीजींवर असाही आरोप केला जातो की त्यांनी आपल्या कुटुंबातील अथवा सानिध्यातील कोणालाही मोठे होवू दिले नाही. परंतु कस्तुरबांचे चरित्र व कार्यकर्तृत्व अभ्यासणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस मात्र हा समज खोटा वाटल्याशिवाय राहत नाही. भारतीय पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रियांच्या विचारक्षमतेवर अथवा कार्यक्षमतेवर नेहमीच दुजाभाव केलेला आहे. त्यामुळे स्त्रियांच्या कार्यकर्तृत्व कायम दुर्लक्षिल्या गेले. याला कस्तुरबाही बळी पडलेल्या दिसतात. कस्तुरबा कशा होत्या याबद्दल साधारणता तीन मतप्रवाह आहेत.त्यातील पहिल्या प्रवाहाला आपण सोईसाठी ‘सावलीवादी’ प्रवाह म्हणू. या अभ्यासकांनुसार बा म्हणजे बापूंची सावली. त्या एक आदर्श हिंदू स्त्री होत्या,



Scanned by CamScanner

एका महान पुरुषाची पत्नी म्हणून त्यांनी आपले कर्तव्य चोखपणे बजावले आणि आपल्या पतीची अतिशय कठीण परिस्थितीत पाठराखण केली.कस्तुरबानी हे सारे केले, यात शंका नाही. पण त्या केवळ बापूंची सावली होत्या,असे म्हणणे त्यांच्यावर अन्याय करणे आहे. बा या स्वतंत्र बुद्धीच्या, कणखर वृत्तीच्या होत्या. त्याना ज्या गोष्टी पटल्या नाहीत, त्यात त्यांनी बापुना विरोध केला. (बेडगे,होळकुंदे, जोशी :२०१९: ४१९) कस्तुरबांचे व्यक्तिमत्व हे बापूंच्या व्यक्तीमत्वासारखे बदलत गेलेलं आहे. त्यातही त्यांचे स्वताचे स्वतंत्र अस्तित्व त्यांनी टिकवून ठेवले होते. आपल्या नव-याचे कार्यकर्तृत्व कितीही मोठे असले तरी त्यांनी कधीही कोणतीही गोष्ट निमुटपणे स्वीकारली नाही. आपल्याला जी गोष्ट पटली नाही, ती आपला थोर नवरा सांगतो म्हणून ऐकायला हवी; हा त्यांचा पिंड नव्हता त्यामागे त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व दडलेले होते. जेंव्हा जेंव्हा गांधीजींच्या मनातील पुरुषी वृत्ती उफाळून आली तेंव्हा तेंव्हा बानी त्यांना प्राणपाने विरोध केला व त्यांची चूक त्यांना पटवून दिली. ही स्वतंत्र बाण्याची बा येथील सर्वसामान्य जनतेने नजरेआड केली (बेडगे,होळकुंदे, जोशी :२०१९: ४२०) हा स्वतंत्र बाणा कस्तुरबा यांनी सदोदित जपलेला होता.

कस्तुरबा गांधी या पूर्वाश्रमीच्या कस्तुरबा कपाडिया होत्या. (अरुण गांधी:२००८:११) महात्मा गांधी आणि कस्तुरबा या दोघांचाही जन्म पोरबंदर येथेच झाला त्यांचे जन्मवर्षही योगायोगाने १८६९ हेच. त्यातही कस्तुरबा बापुंहून वयाने मोठ्या होत्या. त्यांचा जन्म ११ एप्रिल १८६९ चा तर बापूंचा ०२ ऑक्टोबर १८६९ या दिवशीचा. त्यावरून त्यांच्यात वाद झडत, थट्टाही होत. मी तुमच्याहून मोठी असल्याने तुम्ही माझे एकले पाहिजे असे बा म्हणत.(सुरेश द्वादशीवार:२०१८:२४८) कस्तुरबा तत्कालीन रुढीप्रमाणे शाळेत गेल्या नव्हत्या महात्मा गांधींनी लग्नानंतर त्यांना शिकवण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्यांना फार यश आले नाही. महात्मा गांधीजीनी त्यांच्या आयुष्यात अनेक सत्याचे व सत्याग्रहाचे प्रयोग केले याबद्दल त्यांचे नातू अरुण गांधी म्हणतात की, मोहनदास यांनी सत्याचे प्रयोग केले आणि कस्तूरबाने सत्याचा अनुभव घेतला, असे मला वाटते. महात्मा गांधींचा सत्याचा शोध चालू असताना कस्तुरबा वास्तवाबरोबर राहत होती. त्यांच्या प्रयोगासाठी कस्तुरबा त्याग करीत होती. (अरुण गांधी:२००८:१६६) पण या सर्व त्यागामध्ये केवळ गांधीजींची अपेक्षा होती असे नव्हे तर कस्तुरबा यांची या त्यागाबद्दल खात्री झाली होती.

कस्तुरबा खऱ्या अर्थाने सत्याग्रही होत्या, स्वतंत्र वृत्तीच्या होत्या. आपला महान नवरा म्हणतोय म्हणून कोणतीही गोष्ट जशीच्या तशी स्वीकारली नाही. यातूनच सत्याग्रहाचे अनेक प्रयोग प्रथमता गांधींनी आपल्या घरातच केले. यासंदर्भात ते आत्मचरित्रात लिहितात की, कस्तुरबा यांच्यावरील शस्त्रक्रियेमुळे त्यांची पृकृती खालावत चालली होती. गांधीनी अन्नाहर या विषयासंबंधी एके ठिकाणी असे वाचले होते की, ज्याचे शरीर दुबळे आहे त्याने कडधान्य खावू नये. आणि हा विचार त्यांनी कस्तुरबाना सुचवला. पण त्यांनी उलट त्यांनाच 'कडधान्य आणि मीठ सोडायला सांगितले तर उम्हीसुद्धा सोडणार नाहीत' असा सवाल केला त्यावर महात्मा गांधीनी कडधान्य आणि मीठ एक वर्षासाठी सोडले.यावर ते म्हणतात की याला मी सत्याग्रह या नावाने संबोधू इच्छितो. (मोहनदास गांधी:२०११:३१३) याप्रकारचे सत्याचे प्रयोग पती पत्नीच्या संवादातून घरातूनच पुढे यायचे. या अर्थाने महात्मा गांधीच्या सत्याग्रह तत्वाला विकसित करण्यात कस्तुरबा यांचे योगदान ते स्वत: मान्य करतात.

कस्तुरबा गांधीनी महात्मा गांधींच्या सार्वजनिक जीवनात अगदी सुरुवातीपासून सक्रीय सहभाग घेतलेला होता. दक्षिण आफ्रिकेत असतानाच त्यांनी गांधीजींच्या अनेक चळवळी मध्ये सक्रीय सहभाग घ्यावयास सुरुवात झाली होती. महात्मा गांधीनी कस्तुरबा यांच्या साथीनेच सत्याग्रहाचे तत्व दक्षिण आफ्रिकेत विकसित केले होते. अफिर्केत असताना तेथील सर्वोच्च न्यायालयाने १४ मार्च १९१३ रोजिंस निकाल दिला की, जो विवाह ख्रिस्चन पद्धतीने झाला नासेल्त्याला दक्षिण आफ्रिकेत कायद्याने मान्यता दिली जाणार नाही. या निर्णयामुळे दक्षिण आफ्रिकेतील ख्रश्चनाशिवाय



Scanned by CamScanner

 ISBN : 978-81-937477-5-9

इतर सर्व जोडपी ही अनैतिक बनली. याविरोधात महात्मा गांधीनी नातल कॉंग्रसच्या माध्यमातून आवाज उठवला त्यावेळी कस्तुरबा यांनीही या संघर्षात सहभागी होवून तुरुंगात जाण्याची तयारी दाखवली. यावेळी त्या म्हणाल्या होत्या की, "तुम्ही तसच माझी मुले तुरुंगातील कष्ट सहन करू शकता मग मी का नाही करू शकणार?" आणि फिनिक्स मधील महिलांच्या हक्कासाठी त्यांनी आफ्रिकेत पहिल्यांदा हा सत्याग्रह केला होता. त्यांच्यावर खटला झाला आणि तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा करण्यात आली. याबद्दल त्यांचे नातू अरुण गांधी म्हणतात, 'त्या दिवशी न्यायालयातून बाहेर पडत असताना कैद्यांच्या प्रतिक्रियेची नोंद कोणी केली नाही पण माझ्या आजीला त्या क्षणी वाटत असलेला अभिमान आणि काळजी याची कलपना मी करू शकतो. फिनिक्समधील तरुण महिला सहका-यांची तिला काळजी वाटत असणार. सत्याग्रही म्हणून अटक होणाऱ्या पहिल्या महिला हे उद्दिष्ट त्यांनी गाठले होते. (अरुण गांधी:२००८:१७९) या लढ्यात त्यांनी पहिल्या सत्याग्रही महिला होण्याचा मान मिळवला होता तो स्वयंस्फुर्तीने त्यामुळे आफ्रिकेतून भारतात परतल्यानंतर यांनी महात्मा गांधींच्या बरोबरीने अनेक सत्याग्रह चळवळीत सक्रीय सहभाग घेतला.

कस्तुरबा गांधीनी भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात घेतलेला सहभाग आणि अनुभवलेला तुरुंगवास डोळ्यासमोर आणला की आपण हतबुद्ध होतो. १९१६ मध्ये बापुंसोबत चंपारण्य मोहिमेत सहभागी झाल्या. १९३० मध्ये सरदार पटेलांच्या नेतृत्वात झालेल्या बर्दोलीच्या करबंदी आंदोलनात भाग घेऊन त्यांनी तुरुंगवास पत्करला. १९३२ मध्ये त्यांना ब्रिटीश सरकारने कायदेभंगाच्या आरोपावरून तुरुंगात डांबले. १९३३ मध्ये साबरमती आश्रमात अटक करण्यात आली आणि पाच महिन्याच्या एकनात कोठडीत डांबले गेले. १९३९ मध्ये राजकोट आंदोलनात पुन्हा अटक झाली. १९४२ च्या चाले जावं आंदोलनात बापुंसोबत अटक झाली.(सुरेश द्वादशीवार:२०१८:२५०) या स्वातंत्र्य लढ्यातील अनेक तुरुंगवासाचा आणि कस्तुरबा यांच्या संघर्षाचा वृत्तांत खऱ्या अर्थाने त्यांचे स्वातंत्र्य लढ्यातील योगदान समजावून घेण्यासाठी महत्वाचे आहे.

महात्मा गांधीनी भारतात परत आल्यानंतर चंपारण येथील शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे प्रथमता आकर्षित झाले आणि त्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सत्याग्रहाची सुरुवात केली. शेतकऱ्यांच्या बायका व मुला बाळांमध्ये काम करण्यासाठी स्वत: कस्तुरबाही या लढ्यात सहभागी झाल्या होत्या. मोहनदास आणि वकील चंपारण येथील कायदेशीर व राजकीय बाबींमध्ये गुंतले होते तेंव्हा कस्तुरबा, देवदास व इतर स्वयंसेवक यांनी जिल्ह्यातील सामाजिक आणि आरोग्यविषयक प्रश्न हाताळायला सुरुवात केली. जीहाभारातल्या स्वच्छता मोहिमेचे काम कस्तुरबा पाहू लागली. (अरुण गांधी:२००८:२०७) या कामातून महात्मा गांधीच्या सत्याग्रहाला पूर्णत्व प्राप्त करून देण्याचे काम कस्तुरबा यांनी केले. कारण अनेकांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यात स्त्रीशक्तीचा उदय गांधीजींच्या नेतृत्वात शोधला पण ही किमया होती ती खऱ्या अर्थाने कस्तुरबा गांधींच्या नेतृत्वाची. त्यांनी प्रथमत: चंपारण येथील स्त्रियांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला आणि त्यांना सत्याग्रहासाठी सिद्ध केले. त्यामुळे उंबरठ्याच्या बाहेरचे जग न पाहिलेल्या गोशा-पडद्यात अडकून पडलेल्या लाखो स्त्रिया स्वातंत्र्य-संग्रामाच्या निमित्ताने रस्त्यावर आल्या. त्यांनी मोर्चे काढले, लाठ्या-गोळ्या खाल्ल्या, सत्याग्रह केला, भाषणे दिली, लढ्याचे नेतृत्व केले. परदेशी कापडाच्या होळ्या केल्या, दारूविरोधी पिकेटिंग केले. मुख्य म्हणजे, हे करताना समाजाला त्यांच्या स्त्रीत्वाचा बाऊ करता आला नाही. कारण स्वातंत्र्याच्या आकांक्षामुळे स्त्री-पुरुष सात्याग्रह्यांतील शारीर्भाव गळून पडला होता. (बेडगे,होळकुंदे, जोशी :२०१९: ४२०) याचे श्रेय जेवढे महात्मा गांधीना दिले जाते तेव्हढेच कस्तुरबा गांधीनाही द्यायला हवे.

महात्मा गांधींच्या चळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढवण्यात कस्तुरबा यांचे योगदान अत्यंत मोलाचे असे आहे. साबरमती आश्रमात कस्तुरबा इतरांप्रमानेच रोज सकाळी एक तास चरख्यावर सुत काढण्यात घालवी. दौऱ्यावर



Scanned by CamScanner

जाताना ती स्वतःचा चरखा बरोबर घेत असे. तिच्याभोवती महिला जमा होत आणि उत्सुकतेने नाना प्रश्न विचारीत. तेंव्हा भारतातील महिला जर सूतकताई आणि विणकाम करणे शिकल्या तर शांतताप्रिय क्रांतिकारी म्हणून त्या भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात महत्वाची भूमिका बजावू शकतील हे कस्तुरबाला सर्वप्रथम उमगले. अनेक सभांमध्ये गांधीजींच्या शेजारी बसून त्या चरख्यावर सुत काढीत बसलेल्या असत. ते पाहून एरवी सभांमध्ये जाहीर कार्यक्रमात न येणाऱ्या स्त्रिया महात्माजींच्या सार्वजनिक सभांमध्ये येऊ लागल्या. (अरुण गांधी:२००८:२२८) कस्तुरबा यांच्या व्यक्तिमत्वाच्या बदलत्या अवस्थांबद्दल लेखकांनी विविध मते व्यक्त केली आहेत. अविषयी अरुण गांधी म्हणतात, ' माझी आजी वैयक्तिक परिवर्तनाच्या एका दीर्घ प्रक्रियेच्या शेवटाला पोहोचली होती. आपल्या पतीच्या कल्पना आणि ध्येय यांबाबत तिच्या दृष्टीकोनात संथ गतीने प्रगती होत होती. बुचकळ्यात पडणे विरोध करणे, स्वीकारणे, परिवर्तन आणि नेतृत्व करणे असे या प्रक्रियेचे टप्पे होते.सत्याग्रह हे नी:शस्त्र लोकांच्या हातातील उत्कृष्ठ व कदाचित एकमेव हत्यार आहे हे सर्व देशाला पटवून देण्याची तातडीने गरज होती. (अरुण गांधी:२००८:२२७) कस्तुरबाला आपल्या पतीच्या कार्याशी असलेली बांधिलकी दरमहा अधिक दृढ होत असल्याचे जाणवले. असहकार चळवळीच्या दरम्यान कस्तुरबा तळागाळाच्या पातळीवर सत्याग्रहीबरोबर काम करीत होत्या. हे त्यांचे कार्य महात्माजींच्या सावलीतून बाहेर पडून स्वतंत्र वृत्तीने केलेलं कार्य होते असे त्यांचे नातू अरुण गांधी यांना वाटते.

कस्तुरबा गांधी यांच्या मनात वैचारिक परिवर्तन होऊन त्या नेतृत्व करण्यास सिद्ध झाल्या होत्या. यासंदर्भातील उदाहरण म्हणजे त्यांनी १९२२ मध्ये महात्मा गांधीना अटक झाल्यानंतर २३ मार्च १९२२ च्या यंग इंडियात साध्या शब्दात आवाहन केलेलं होते. 'माझ्या पतीला सहा वर्षे कैदेची शिक्षा ठोठावण्यात आली आहे. त्याचा परिणाम ...भारत जागा होईल आणि कॉंग्रेसचे विधायक कार्य पुढे नेण्याचे गंभीर प्रयत्न करील याबद्दल माझ्या मनात शंका नाही. ज्यांना माझ्याबद्दल आस्था वाटते आणि ज्यांचा माझ्या पतीला पाठींबा आहे अशा सर्व स्त्री-पुरुषांना मी आवाहन करते की, विधायक कार्यक्रमावर लक्ष केंद्रित करा. आणि ते यशस्वी करा. आपल्या यशामुळे भारतीय जनतेच्या समोरचे आर्थिक प्रश्न सुटतील, तसेच राजकीय गुलामगिरीतून आपली मुक्तता होईल. तेंव्हा गांधींच्या निष्ठेवर आपली बांधिलकी हवी.' (अरुण गांधी:२००८:२२७) अशा प्रकारच्या आवाहनातून कस्तुरबानी जनतेला हतबल न होता विधायक कार्य करण्यासठी प्रेरित केले.गांधींच्या अनुपस्थितीत त्यांनी केलेळे हे प्रयत्न म्हणजे नेतृत्व स्वीकारण्याचेच द्योतक होते. स्वतः कस्तुरबाही अशा प्रकारच्या विधायक कार्यात पुढाकार घेत होत्या.

गोलमेज परिषदेच्या असफलतेनंतर नागरी असहकाराचे प्रयत्न सरकारकडून हाणून पाडण्यात आले. यावेळी सरकार कोणालाही अटक करू शकत होते. कॉंग्रेसला चिरडून टाकण्याचे प्रयत्न त्यांनी चालवले होते. याविरोधातही कस्तुरबानी आग्रही भूमिका घेतली. सरकारविरोधात महिलांची शक्ती एकवटवण्याचे काम त्यांनी केले. सरकारने अटक केलेल्या लोकांमध्ये महिलांचा मोठा भरणा होता. अटक केलेल्या पहिल्या काही महिलांमध्ये कस्तुरबा होती. मुंबईमध्ये आपल्या पतीला झालेली पाहून बा आश्रमात परतली होती. तेथे बाला आणि इतर महिलांना पकडून नजीकच्या साबरमती तुरुंगात पाठविण्यात आले. बाने यापूर्वी दक्षिण आफ्रिकेत कारावास भोगला होता. मायदेशातील तुरुंगवासाचा हा तिचा पहिलाच अनुभव होता. पुढील दोन वर्षात तिला पाच वेळा तुरुंगवासाची शिक्षा भोगावी लागली. ( अरुण गांधी:२००८:२५०) या कालावधीत सरकारी तुरुंग हे जणू कस्तुरबासाठी दुसरे घरच बनले होते. या त्यांच्या सततच्या तुरुंगवासामुळे सामान्य महिलांमधील तुरुंगवासाची भीती नष्ट व्हायला मदतच झाली. त्यामुळे महिलांची चळवळीतील संख्या लक्षणीय स्वरुपात वाढली. कस्तुरबा यांची महिलांना संघटीत करण्याची शक्ती पाहून गांधींपेक्षा कस्तुरबा गांधी यांचा कायदा व सुव्यवस्थेला अधिक धोका आहे असे ब्रिटीश सरकारला वाटू लागले होते. यामुले



Scanned by CamScanner

 ISBN : 978-81-937477-5-9

खऱ्या अर्थाने कस्तुरबांचे स्वतंत्र असे नेतृत्व इक्सित झाले होते हे लक्षात घेतले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील गांधींच्या विचारातून पुढे आलेला शेवटचा लढा म्हणून चाले जाव आंदोलनाकडे पाहिले जाते. हे आंदोलन एक जनांदोलन होते. ब्रिटीश दुसऱ्या महायुद्धात गुंतले असताना इथे भारतीयांनी त्यांच्या विरोधात आंदोलन उभारून त्यांना भारत सोडण्यास बाध्य करावे हा त्यांचा विचार होता. ७ ऑगष्ट १९४२ रोजी कॉंग्रेसच्या खुल्या अधिवेशनात महात्मा गांधीनी कॉंग्रेस सदस्यांना उद्देशून केलेल्या भाषणात म्हटले होते, "मी तुम्हाला एक छोटा मंत्र देणार आहे.तो असा: 'करा अथवा मरा' आपण भारताला स्वतंत्र तरी करू किंवया प्रयत्नात मृत्यूला सामोरे जाऊ" गांधीनी प्रत्येक आंदोलकाला आपल्या छातीवर कागदी करा अथवा मरा असे लिहिलेले बिल्ले लावायला सांगितले होते. या त्यांच्या घोषणेमुळे ब्रिटीश सरकारने सावध पवित्र घेत आंदोलन सुरु होण्यापूर्वीच आंदोलनाच्या नेत्यांना अटक करून तुरुंगात टाकायला सुरुवात केली. याचाच भाग म्हणून महात्मा गांधी यांना ०९ ऑगष्ट १९४२ रोजी अटक करून आगाखान पैलेस येथे स्थानबद्धतेत ठेवले. त्याच दिवशी त्यांची मुंबईतील शिवाजी पार्क येथे सभा होणार होती. परंतु गांधीना अटक झाल्यामुळे सभेसाठी जमलेल्या लोकांचा हिरमोड होणार होता. अशा वेळी कस्तुरबा गांधीनी या सभेला संबोधित करण्याचे आव्हान स्वीकारले. त्या म्हणाल्या, "निराश व्हायचे काही कारण नाही. मी सभेत भाषण करीन."(अरुण गांधी:२००८:२८०) अनेक नेत्यांनी कस्तुरबा यांना सरकार आपणास अटक करेल असे सुचवले परंतु कस्तुरबानी अटकेला न घाबरता शिवाजी पार्क मैदानावरील जनसमुदायास लिखित स्वरूपातील भाषण दिले.त्यात त्यांनी म्हटले होते, 'अखिल भारतीय कॉंग्रेसच्या अधिवेशनात काल रात्री गांधीजी यांनी दोन तास आपले मन तुमच्यापुढे मोकळे केले. त्यात मी काय भर घालणार? त्यांच्या ध्येयांना जगणे हेच आपल्या हाती आहे. भारतातील स्त्रियांनी आता आपले सत्व दाखवले पाहिजे. या लढ्यात सर्व महिलांनी मग त्या कुठल्याही जाती-धर्माच्या असोत, सहभागी झाले पाहिजे. सत्य आणि अहिंसा ही तत्वे आपण पाळली पाहिजेत.' .( अरुण गांधी:२००८:२५०) या भाषणामुळे गांधीजींची उणीव भरून नघाली. कस्तुरबा गांधी यांनी प्रतीगांधी होऊन या सभेला मार्गदर्शन केले होते. ही उर्मी त्यांच्यामध्ये असलेल्या स्वतंत्र वृत्तीमुळेच त्यांच्यात आली होती. त्या गांधींच्या सावलीत वाढलेल्या असल्या तरी त्या गांधीशिवाय नेतृत्व करू शकत होत्या नव्हे तर त्यांनी ते करून दाखवले होते. महात्मा गांधीनी या लढ्यात प्रत्येकाने छातीवर करा अथवा मरा असा बिल्ला लावायला सांगितलेला होता कस्तुरबाचा पुतण्या कनू गांधी यांनी सभेला जात असताना घाईघाईने बिल्ला देत होता त्यावेळी कस्तुरबा म्हणाल्या "हा मंत्र अझ्या काळजावर कोरलेला आहे त्याची आठवण करून देण्यासाठी कागदाचा बिल्ला मला कशाला हवा" हे त्यांनी दिलेलं उत्तर भारतीय स्वातंत्र्य लढ्यात त्या गांधींशी किती एकरूप झाल्या होत्या हे दर्शवते.

कस्तुरबा यांच्या शिवाजी पार्कवरील भाषण संपल्यानंतर त्यांना लागलीच अटक करण्यात आली. सुरुवातीला त्यांना ऑर्थर रोड तुरुंगात नेण्यात आले आणि नंतर महात्मा गांधी होते त्या आगाखान पैलेस येथे त्यांना स्थानबद्धतेत ठेवण्यात आले. यावेळी त्यांची पृकृती बरीच ढासळलेली होती. या स्थानबद्धतेत असतानाच २२ फेब्रुवारी १९४४ रोजी त्यांनी बापूंच्या मांडीवर प्राण सोडला.कस्तुरबांचेहे स्वातंत्र्य लढ्यात समर्पित होणे गांधींच्या व्यक्तिमत्वाला अधिक उंची मिळवून देणारे ठरले. कस्तुरबा गांधींच्या मृत्यूची वार्ता देत असताना द टाईम्स ऑफ इंडियाच्या संपादकीयात लिहिले होते. 'श्रीमती गांधी या भारताच्या महान महिलांपैकी एक होत्या. आपल्या पाटीवर त्यांची दुर्दम्य निष्ठा होती. ६० वर्षे त्यांनी गांधींची साथसांगत केली. एका महत्म्याची पत्नी म्हणून त्यांच्याबरोबर तिने तुरुंगवास पत्करला. राजकीय आंदोलन, निदर्शक आणि सत्याग्रही अशा भूमिका बजावल्या. थोर व्यक्तींच्या पत्नींनी क्वचितच त्यान्च्यैटका आदर संपादन केला असेल. भारतीय जनतेच्या स्मरणात एक अद्वितीय स्थान त्यांनी मिळवले होते. याची त्यांना जाणीव नसेल.



Scanned by CamScanner

त्या दयाळू अंत:करण असलेल्या शूर महिला होत्या. भारतातील लक्षावधी जनतेला त्या 'बा' म्हणजे मत म्हणून ठाऊक होत्या' हे त्यांच्या जीवित कार्याचे केलेलं वर्णन यथार्थ असे वाटते.

कस्तुरबा गांधी या महात्मा गांधींच्या पत्नी होत्या म्हणून त्यांच्या कार्याचे प्रभावक्षेत्र गांधीएवढे जरी नसले तरी त्यांच्या कार्याला उंची प्राप्त करून द्यायचे काम मात्र कस्तुरबा यांनी केले होते. म्हणूंच त्यांच्या मृत्युनंतर गांधीनी म्हटले होते, माझ्यातले उत्तम अर्धांग अर्ण पावलेय.यावरून हे जोडपे एकमेकांत विचार व कृतीने एकमेकांत लीन झाले होते याची प्रचीती येते. याअर्थाने कस्तुरबा या भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील पहिल्या महिला सत्याग्रही होत्या. त्यांच्या व्यक्तिमत्वाची उंची सांगत असताना त्यांचे पणतू तुषार गांधी यांनी मोहनदास गांधी यांना लोकांनी महात्मा केले. आपण एखाद्याला हिरो मानतो तेव्हा दुसऱ्या कुणाला तेथपर्यंत पोहोचूच देत नाही. त्याच्याकडून दिव्यत्वाची अपेक्षा केली जाते. पण आम्हा कुटुंबीयांसाठी महात्मा गांधी सामान्य व्यक्तीच होते. त्यांच्या महात्म्यापुढे कस्तुरबा गांधी यांची प्रतिमा झाकोळली गेली. त्यासाठी आम्ही वंशजदेखील जबाबदार आहोत. आम्ही कस्तुरबाकडे दुर्लक्ष केले, अशी खंत व्यक्त केली आहे.

**संदर्भसूची :**


१. गांधी मोहनदास करमचंद, सत्याचे प्रयोग अथवा आत्मकथा, नवजीवन प्रकाशन मंदिर, अहमदाबाद,२०११.

२. गांधी अरुण,(अशोक जैन अनु.) कस्तुरबा शलाका तेजाची, रोहन प्रकाशन,पुणे, २००८.

३. बेडगे,होळकुंदे, जोशी (संपा), शोधशिल्प , प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे अमृतमहोत्सव गौरव ग्रंथ समिती, लातूर.२३ जून २०१९.

४. द्वादशीवार सुरेश, गांधीजी आणि त्यांचे टीकाकार,साधना प्रकाशन, पुणे,२०१८.

5. कसबे रावसाहेब, गांधी पराभूत राजकारणी विजयी महात्मा, लोकवांग्मय गृह, २०२१.


⌘ ⌘ ⌘



Scanned by CamScanner